
# तुका झालासे कळस



७९६५
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. ४९९

REFBK-0015052

# तुका झालासे कळस

## तुकारामाचें देहू

देहूसी जाऊनि। देह विसरावा।
अंतरीं स्मरावा। तुकाराम॥

रामचन्द्र चिन्तामण ढेरे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १५०५२

किंमत
६० पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

REFBK-0015052

वोरा ॲण्ड कंपनी, पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २

मौज प्रकाशन ग्रंथ-माला : ७

श्री : १०१ : २

© वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा लि.

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शन - माला : ६

आवृत्ति तिसरी
१९६५

किंमत ६० पैसे

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केन्द्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें.

प्रकाशक
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्राय. लि करिता
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २

मुद्रक
अनंत जे. शाह
लिपिका प्रेस, कुर्ला रोड,
अंधेरी, मुंबई ५९

## सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

महाराष्ट्रातील सांस्कृतिक केंद्रांचीं भावरम्य आणि बोलकीं शब्दचित्रें तेथील सर्व ऐतिहासिक पार्श्वभूमि, त्या त्या स्थानातील महात्त्वाच्या मूर्तींचीं, स्थळांचीं सुरेख विश्वसनीय चित्रें, तेथें जाण्याचे रस्ते, तेथील उत्सव, दर दिवशींचे कार्यक्रम याची माहिती देणारीं मार्गदर्शक पुस्तकें.

या पुस्तकातील भावना फुलविणारा इतिहास आणि डोळसपणा देणारी माहिती वाचून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक दर्शनाचें समाधान अवश्य लाभेल.

- मोठा, जाड टाइप, सोपी भाषा, आकर्षक मांडणी.
- ही पुस्तकें म्हणजे घरबसल्या महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा आणिसतदर्शनें; भाविक यात्रेकरूना आणि चिकित्सक प्रवाशांनाहि मार्गदर्शक. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांना अति उपयुक्त.
- **डायरेक्टर ऑफ एज्युकेशन मुंबई राज्य-कडून शालेय ग्रंथालयांसाठीं शिफारस.**
- **लोकशिक्षण समिति, महाराष्ट्र विभाग यांच्याकडून प्रौढ साक्षरांसाठीं पुरस्कृत.**
- **असिस्टंट क्युरेटर ऑफ लायब्ररीज, महाराष्ट्र विभाग यांनीं सार्वजनिक वाचनालयांकरितां विशेष शिफारस केलेली.**




75042

**पवित्र तें कुल, पावन तो देश :**

देहू हें पुण्यापासून अठरा मैलांवरचें एक खेडेगांव. पुणें जिल्ह्यांतील हवेली तालुक्यांत इंद्रायणीच्या कांठावर हें खेडें वसलेलें आहे. पुणें-मुंबई रस्त्यावर पुण्यापासून १५ मैलांवर असलेल्या देहूरोड स्टेशनपासून पूर्वेस तीन मैलांवर हें गांव आहे.

सोळाव्या शतकापूर्वी वसलेल्या या गांवांत तुकोबांच्या पूर्वी वा नंतर कोणतीहि प्रसिद्ध ऐतिहासिक घटना घडली नाहीं. येथें एकहि प्रेक्षणीय वास्तुशिल्प नाहीं वा बेभान करणारें निसर्गसौंदर्यहि नाहीं. परंतु तरीहि देहू म्हटलें कीं हृदय तुकोबांच्या स्मरणानें भारावून जातें आणि त्या महामानवाच्या भूमीचें दर्शन घ्यावें, त्याच्या पावलांच्या स्पर्शानें पावन झालेली धूळ कपाळीं लावावी, त्याच्या संजीवक स्मृतीपुढें नमावें व आपलें जीवन अंशतः तरी धवळावें, अशी ओढ मनाला वाटूं लागते.

केवळ तीनशें घरांचें आणि जेमतेम दोन हजार लोकवस्तीचें हें गांव तुकोबांच्या निवासामुळें महाराष्ट्रांतील एक अग्रगण्य तीर्थ बनलें आहे. या लहानशा खेड्याविषयीं मराठी मनांत अत्यंत आदराची भावना आहे. प्रतिवर्षी फाल्गुन वद्य द्वितीयेला या महापुरुषाचें पुण्य-स्मरण करण्यासाठीं मराठी भूमीच्या कानाकोपऱ्यांतून लाख-दीड

लाख वारकऱ्यांचा समुदाय जमतो. कुठल्याहि निमंत्रणावांचून, नियंत्रणावांचून आणि व्यावहारिक लाभाच्या आकांक्षेवांचून एवढीं माणसें या खेड्याकडे धांवावीं, हा एक चमत्कार आहे. लक्षावधि हृदयांना आकर्षिणारें हें सामर्थ्य आगळें आहे. संतांच्या संसर्गानेंच भूमीला तीर्थरूपता येत असते, जळाला पावकता येत असते. वास्तविक भूमि आणि पाणी सर्वत्र सारखेंच असतें. सर्व मानवांचा पिंड एकाच मातीवर आणि पाण्यावर पोसला जातो; एकाच वातावरणांत श्वसन करीत असतो; एकाच सूर्याच्या प्रकाशांत जीवनव्यापार पार पाडतो. पण मानवाच्या आत्म्याचें भरण-पोषण होतें संतांच्या सान्निध्यांत, त्यांच्या सान्निध्यानें पावन झालेल्या भूमीच्या परिसरांत. डोळे असूनहि ठेचकाळणारा, भरदिवसांहि स्वार्थांधकारांत वावरणारा आणि जिवंत असतांहि प्रेतकळा आलेला मानव अंतर्बाह्य उजळतो, तो या संतभूमींतच. देहूचें महिमान मोठें आहे, याचें कारण ती एक संतभूमि आहे—एका महान् संताची जन्मभूमि आहे, कर्मभूमि आहे आणि निर्याणभूमीहि आहे. या भूमीनें एका नराचा नारायण झालेला पाहिला आहे. आपल्या गांवाची टिचभर चतुःसीमा न सोडतां साडेतीन हात देहांत वावरणाऱ्या एका आत्म्यानें जिथें ब्रह्मांडाला गवसणी घालण्याची भाषा वापरली आणि अनुभूति प्राप्त केली, तीच ही भूमि !

पवित्र तें कुळ, पावन तो देश । जेथें हरिचे दास जन्म घेती ।

धन्य देहू गांव, पुण्यभूमि ठाव :

या भावनेनें आमण देहूरोडपासून देहूपर्यंतचा तीन मैलांचा रस्ता तुडवून देहूंत प्रवेश करूं लागलों कीं इथें काय काय पाहायचें, असा खुला प्रश्न पुनः आपल्या मनांत तरळतोच. माणसाच्या मनाला निर्गुणाचा, अमूर्त तत्त्वाचा साक्षात्कार सहजीं

होत नाहीं. त्याला कांहीं तरी सगुण-साकार हवें असतें. सगुण-साकाराच्या दर्शनाशिवाय निर्गुण-निराकाराची कल्पनाच त्याला अशक्य वाटते. सगुणाच्या महाद्वारांतूनच निर्गुणाच्या गाभाऱ्यांत त्याला प्रवेश करतां येतो. म्हणून तर आपल्या भारतीय परंपरेंत प्रतिमा आणि प्रतीकें यांचें महत्त्व मानलें आहे.

पण होतें नेमकें वेगळेंच. प्रतीकाच्या दर्शनांतून प्रतीका-मागच्या भावनेचा वा तत्त्वाचा मनांत उदय व्हावा, अशी अपेक्षा असते. पण आपण जड-मूढपणें जीवनभर प्रतीकांनाच कवटाळून बसतों; त्यांच्या पूजनाचें कर्मकांड उभारतों; आणि त्या प्रतिमा-पूजनाच्या कर्मकांडापायीं मूलतत्त्वाचाच बळी देतों.


देहूंत आपल्याला प्रवेश करावयाचा आहे, तो ही जाणीव ठेवूनच. इथें प्रत्येक मंदिरांतून, प्रत्येक पाषाणांतून, प्रत्येक तरु-पर्णांतून आणि प्रत्येक जलबिंदूंतून आपल्याला तुकोबांचें दर्शन घ्यावयाचें आहे; विश्वाशीं एकरूपता पावलेल्या त्या आभाळाएवढ्या हृदयाच्या संताशीं जवळीक करावयाची आहे; त्याच्या मनोमय चरणांशीं बसून जीवनशुद्धीची भीक मागावयाची आहे.

तुम्हांला मंदिरांचीच यादी हवी आहे ना? अठराव्या शतकाच्या अखेरीस कुणा तुकाराम-भक्तानें देहूचें वर्णन केलें आहे तें पाहा :

धन्य देहू गाव पुण्यभूमि ठाव । तेथें नांदे देव पांडुरंग ।।
धन्य क्षेत्रवासी लोक ते दैवाचे । उच्चारिती वाचें नामघोष ।।
कर कटीं उभा विश्वाचा जनित । वामांगीं ते माता रखुमादेवी ।।
गरुड पारीं उभा जोडुनिया कर । अश्वत्थ समोर उत्तराभिमुख ।।
दक्षिणे शंकर लिंग हरेश्वर । शोभे गंगानीर इंद्रायणी ।।
लक्ष्मीनारायण बल्लाळाचें बन । तेथें अधिष्ठान सिद्धेश्वर ।।

विघ्नराज द्वारीं बहिरव बाहेरीं । हनुमंत शेजारीं सहित दोघे ।।
तेथें दास तुका करितो कीर्तन । हृदयीं चरण विठोबाचे ।।

देहू गांवाच्या मूळ गांवठाणास पंधरा-वीस फूट उंचीची वेस होती. त्या वेशीला आठ-नऊ वर्षांपूर्वीपर्यंत उत्तर व पूर्व दिशांस दोन दरवाजे होते. हे दरवाजे रस्त्याच्या सोयीसाठीं आतां पाडून टाकले आहेत. पुण्या-मुंबईकडून जाणारे आपण पूर्व-वेशीनें आंत गांवांत प्रवेश करतों. बाजारपेठेंतून देवळाकडे आल्या-वर समोरच विठ्ठल-मंदिराचें पूर्वद्वार दिसतें. यालाच महाद्वार असें




देऊळवाड्याचें पूर्व-महाद्वार


म्हणतात. देवळासभोंवतालचा हा तट महाळुंग्याच्या इंगळे पाटलांनीं अडीचशें वर्षांपूर्वीं बांधला आहे. ही दगडी भिंत बरीच रुंद आहे. तिची रुंदी सुमारें पांच फूट आणि उंची तीस फूट आहे. या भिंतीला लागून उत्तरेकडे शंभर फूट लांब व सोळा फूट रुंद असा दगडी कट्टा आहे. दर्शन घेऊन परत येतांना यात्रिक उत्तरेकडच्या

द्वारानें बाहेर पडून पाय धुण्यासाठीं घाटावरून नदींत उतरतात. या उत्तर द्वारासहि महाद्वारच म्हणतात. या दोन महाद्वारांशिवाय पश्चिम आणि दक्षिण दिशांस दोन लहान दरवाजेहि या तटाला आहेत. पैकीं पश्चिम दरवाजानें सरळ नदींत उतरतां येतें आणि दक्षिण दरवाजा इनामदारांच्या वाड्यांत जाण्यासाठीं खाजगी वापरांतला आहे. पूर्व, पश्चिम आणि उत्तर दरवाजांवर नगारखान्यासाठीं व बसण्यासाठीं जागा बांधलेल्या आहेत. देवळाच्या भिंतीला लागून एक मोठा दगडी घाट बांधलेला आहे. याला 'देऊळवाट' म्हणतात आणि तटाच्या आंतील मंदिरांच्या समूहाला 'देऊळवाडा' म्हणतात. पूर्वी इनामदारांचा (तुकोबांच्या घराण्याचा) वाडाच 'देऊळवाडा' म्हणून समजला जात असे.

उत्तर महाद्वाराजवळच्या भिंतीस लागून बांधलेल्या ओवरींत डाव्या बाजूस गणपति आहे. तेथून अलीकडे आल्यावर दोन दीपमाळांच्यामध्यें गरुड व बाजूला अश्वत्थ आहे. दीपमाळेच्या पूर्वेस मारुतीचें छोटें देऊळ आहे. हा हनुमान राममंदिरासमोर आहे. गरुडपार मात्र विठ्ठलासमोर नसून कांहींसा बाजूला आहे. विठ्ठलाच्या पूर्वेस राममंदिर आहे. हें मंदिरहि इंगळे पाटलांनींच बांधलेलें आहे. या रामाच्या बाजूनें आपण विठ्ठल-मंदिराच्या सभामंडपांत चढलों कीं तेथें वीणाधारी उभा असलेला दिसतो. हा सभामंडप ४० × ४२ फूट इतक्या विस्ताराचा आहे. यानंतर पुढें



देऊळवाड्यातील अश्वत्थवृक्ष, दीपमाळ, मारुतीचें देऊळ इ.




सिद्धेश्वराचे देऊळ

५० X १५ फूट एवढ्या विस्ताराचा एक लाकडी मंडप असून त्याहिपुढें २० X ३० फूट एवढ्या विस्ताराचा मूळ मंदिराचा सभामंडप आहे. या मंडपांतून आपण गाभाऱ्यांत उतरतों. गाभाऱ्याचा विस्तार २० X १२ फूट इतका आहे. गाभाऱ्यांत उजव्या बाजूस एक लहानशी खोली आहे. तें देवाचें शेजघर होय. पादुकाहि येथेंच ठेवल्या जातात. गाभाऱ्यांत वामांगीं रुक्मिणी असलेल्या पांडुरंगाची मूर्ति आहे. विठ्ठलदर्शन घेऊन आपण प्रदक्षिणा करूं लागलों कीं राममंदिराच्या बाजूनें आपण देवळाच्या मागें जातों आणि नैर्ऋत्य कोपऱ्यावर आल्यावर ओवरींत हरिहरेश्वराचें मंदिर दिसतें. हें उत्तराभिमुखी शिव-मंदिर पुरातन आहे. प्रदक्षिणा पुरी करून देवळांत शिरण्यापूर्वीं मुख्य देवळाला लागून एक खोली आहे, तेंच तुकारामांचें वृंदावन होय. येथें एका शिळेवर तुकोबा चिंतन करीत बसत. या ठिकाणीं पादुका स्थापल्या असून तुकोबांचा मुखवटाहि ठेवला आहे. हें वृंदावन, देऊळ बांधण्यापूर्वीं नारायणबावांनीं इ. स. १७०४ मध्यें बांधलें.

## नित्य नवा दिस जागृतीचा :

देऊळवाड्यापासून जवळच तुकोबांचें जन्मस्थान आहे. या जन्मस्थानांत तुकोबांची एक पाषाणमूर्ति बसविली असून, तिला पोशाख चढविलेला असतो. या ठिकाणीं इ. स. १६०८ मध्यें तुकोबांचा जन्म झाला. विठ्ठलभक्तीचा वारसा त्यांच्या घराण्यांत चालत आलेला होता. घरीं दुकानदारी होती. व्यवहार कौशल्यानें

चालू होता; परंतु दुष्काळ आला आणि अन्नान्नदशेंत कुटुंब जगत असतांना प्रचंड मनुष्यहानि झाली. या संकटाच्या आघातानें तुकोबा अंतर्मुख बनले. दुःखावर नि अ-समाधानावर मात करण्याचा उपाय कोणता, खरें शाश्वत सुख कशांत आहे, यासंबंधीं त्यांचें मन विचार करूं लागलें; आणि स्वाभाविकच या मनःस्थितींत त्यांनीं आपल्या घराण्यांत भक्तिविषय बनलेल्या पांडुरंगाचे पाय धरले.



देऊळवाड्यातील तुकोबाचें वृंदावन

परंतु विकारी मन मागें खेचूं लागलें. क्षुद्र भोगांच्या मोहानें मनाची स्थिरता प्राप्त होईना. सत्यासत्य, पापपुण्य, सारासार यांचा निर्णय घेतां येईना. क्षणैक वाटे, नको ही साधना – नको ही देवाची ओढ. पण आंतली ऊर्मि स्वस्थ बसूं देत नव्हती.

माझे मज कळों येती अवगुण । काय करूं मन अनिवार ।।

अशी त्यांची हताश अवस्था झाली. 'आपुलेंचि मन । करवी आपणां बंधन ।' असा अनुभव नित्य येऊं लागला. शेवटीं ही



तुकोबाची जन्मस्थानातील मूर्ति

लौकिकाची ओढ आणि अलौकिकाचा ध्यास यांची ओढाताण दूर करण्यासाठी त्यांनीं पांडुरंगालाच बनविलें —

जनीं जनार्दन ऐकतों हे मात
कैसा तो वृत्तान्त न कळे आम्हा !
जन्म जरा मरण कवण भोगी भोग
व्याधि नाना रोग सुख-दुःखें ?
पाप-पुण्यें, शुद्धाशुद्ध आचरणें
हीं कोणाकारणें कवणें केलीं ?
आम्हा मरण नाश, तू तव अविनाश
कैसा हा विश्वास साच मानू ?
तुका म्हणे तूचि निवडी हा गुढार
दाखवी साचार तूचि मज !

या भूमिकेवर त्यांनीं मनाचें मंथन केलें; लोकनिंदेची पर्वा केली नाहीं; दांभिकांच्या दिशाभुलीला मन बळी पडूं दिलें नाहीं— मनाला विवेकाचा नित्य अंकुश लावला आणि नित्य नवा जागृतीचा प्रकाश अनुभवला. या अनुभूतीच्या प्रकाशांत त्यांचें अंतर्बाह्य जीवन धवळून निघालें आणि कीर्तनाला तेज प्राप्त झालें. 'ब्रह्मीभूत काया होतसे कीर्तनीं' असा उत्कट अनुभव त्यांना येऊं लागला. या विशुद्ध अवस्थेंतच त्यांना १९ जानेवारी १६४३ (माघ शुद्ध १०, गुरुवार) या दिवशीं स्वप्नांत बाबाजी चैतन्यांचा गुरुबोध लाभला. या घटनेमुळें त्यांच्या साधनेला पूर्तीचें फळ लाभलें आणि तुकोबा पूर्ण झाले.

न कळे दिवस-राती। अखंड लागलीसे ज्योती।

असें प्रकाशानें जीवन ओतप्रोत झालें. एक पांडुरंगच आंत-बाहेर सर्वत्र सामावलेला प्रतीत झाला. या अनुभवाच्या प्राप्तीनंतर

तुकोबांनीं अनेक रंजल्या-गांजल्या जीवांना, आर्त आत्म्यांना, हताश हृदयांना संजीवनी दिली – त्यांच्या अंधारलेल्या जीवनांत प्रकाश निर्माण केला आणि 'याचि देहीं याचि डोळां' मुक्तीचा सोहळा कसा अनुभवावा, याचें रहस्य सांगितलें.

विठ्ठलमंदिराच्या परिसरांत वावरतांना हा सारा इतिहास मनांत तरळूं लागतो. आपलें क्षुद्र जिणें पाहून मन संकोचतें आणि तुकोबांच्या स्मृतीपुढें मनोबलाची याचना करतें. मनाला मुरडून अनंताला मिठी देण्याइतकें पवाडपण आपल्याला नाहीं प्राप्त करतां येणार, अशी जाणीव होते. तोंच आपल्याच मनाच्या गाभ्यांतून तुकोबा गरजतात–

संकोचोनि काय झालासी लहान ?
घेईं आपोशण ब्रह्माण्डाचें !

या अदम्य निष्ठेनें आणि आत्मविश्वासानेंच तुकोबांनीं जीवन कृतार्थ बनविलें आणि ज्ञानदेवांनीं रचलेल्या पायावर नामदेव-एकनाथांनीं उभारलेल्या भागवत-धर्माच्या मंदिराला 'सोन्याचा कळस' चढविला. मंदिराच्या कळसाचें दर्शन घेऊन आपण उत्तर महाद्वारांतून बाहेर पडूं लागलों कीं बहिणाबाईच्या त्या प्रसिद्ध अभंगाची आठवण येते–


सतकृपा झाली । इमारत फळा आली ॥
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ॥
नामा तयाचा किंकर । तेणे केलासे विस्तार ॥
जनार्दनी एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ॥
भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ॥

मंदिरांतून बाहेर पडल्यावर आपण इंद्रायणीच्या पाण्यांत पादप्रक्षाळण करूं आणि घाट चढून वर आल्यावर विश्रांति-कट्ट्यावर जरा वेळ स्थिरावून उत्तर-महाद्वारासमोरच्या तुकोबांच्या वंशजांच्या समाधींचें दर्शन घेऊं. या समाधि-शिळांच्या समूहांत

तुकोबांचे चिरंजीव आणि देहूचें महिमान प्रयत्नपूर्वक वाढविणारे पितृभक्त नारायणबाबा हेहि विसांवले आहेत. या समाधींच्या पलीकडे लहानसें महादेवाचें मंदिर आहे. या मंदिराला लागूनच इंद्रायणीला बांधलेला नवीन पूल आहे. याच पुलावरून पलीकडे गेल्यावर मैल-दीड मैल अंतरावर येलवाडी आहे.

## चहूं वर्णांसी हा असे अधिकार :

नदीकांठानें जातांना उजव्या बाजूला हरिजन-वस्तींत चोखामेळ्याचें मंदिर आहे. तुकोबांच्या जातिभेदातीत वृत्तिवर विश्वसून कुणा तरी जाधव नामक भाविकानें हें मंदिर बांधलें आहे. परंतु दुर्दैव असें कीं, चोखा आणि तुका या दोघांचीहि प्रेरणा दुबळी ठरली आणि युगाचे संस्कार घडलेली आमची क्षुद्र वृत्तीच प्रबळ झाली. या मंदिराकडे सहसा कुणी स्पृश्य वळत नाहीं. ज्या ज्ञानेश्वरांनीं चोख्याच्या चोख हृदयाचा गौरव केला आणि 'येथ भक्ति गा एक सरे। जाति अप्रमाण ॥' असें आक्रोशून सांगितलें, ज्या नाथांनीं कळवळ्यानें अस्पृश्यांना जवळ केलें आणि ज्या तुकोबांनीं जातींच्या भेदांची विफलता उद्घोषिली, त्याच संताच्या दर्शनासाठीं जातांना आपण अजूनहि चोख्याला वगळतों. तो दुर्दैवी संत गेलीं सातशें वर्षें या अन्यायानें विव्हळ होऊन आक्रोशत आहे –



चोखामेळ्याचें देऊळ

चोखा डोंगा परि भाव नोहे डोंगा,
काय भुललासी वरलिया रंगा ?

देऊळघाटावरून नदीतीरानेंच चालत गेलें कीं पुलाच्या पुढें मोठा डोह लागतो. येथें इंद्रायणीच्या पाण्याचा सर्वांगीं स्पर्श होण्यासाठीं स्नानाचा मोह झाल्याशिवाय राहत नाहीं. येथें स्नान करून घाटानें वर यायचें आणि तुकोबांच्या निर्याणभूमीचें दर्शन घ्यायचें.

## आम्ही जातों अमुच्या गांवा

आपण गोपाळपुऱ्यांत प्रवेश केला म्हणजे एका छोट्या अश्वत्थ वृक्षाखालीं तुकोबांच्या निर्याणाचें स्थान आपल्याला आढळेल. याच ठिकाणाहून फाल्गुन वद्य ५, शके १५७१ (सोमवार) या दिवशीं तुकोबा येथून कुडीसह गुप्त झाले. तुकोबा जीवनांत कृतकार्य झाले होते. ते केवळ 'उपकारापुरते' उरले होते. आपल्या अनुभवाचें धन मेघवृष्टीनें लुटविल्यानंतर त्यांनीं देहाचा निरोप घेऊन त्या अनंताशीं एकरूप होण्याचा निर्णय घेतला. वास्तविक त्यांच्या आत्म्यानें त्या असीम परमात्म्याला केव्हांच सामरस्यानें कवळलें होतें. आतां केवळ घट फुटून घटांतील जळाचा सागराच्या अनंत जळराशिशीं मेळ साधावयाचा उरला होता; पण तुकोबांचें वैशिष्ट्य असें कीं, ते त्या घटासहित अनंतांत विरून गेले.

याच ठिकाणीं फाल्गुन वद्य प्रतिपदेच्या रात्रीं तुकोबांनीं संकीर्तन सुरू केलें. कीर्तनाच्या आनंदांत त्यांना 'आनंदसागरीं आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचें ॥' असा अनुभव आला. त्यांच्या आंतल्या दृष्टीला एक मनोहारी दृश्य दिसूं लागलें —

पैल आले हरी। शंख चक्र शोभे करीं ॥
गरुड येतो फडत्कारें। 'नाभी नाभी' म्हणे त्वरें ॥

मुगुट कुंडलाच्या दीप्ती । तेजें लोपला गभस्ती ।।
मेघश्याम वर्ण हरी । मूर्ति डोळस साजिरी ।।
चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ।।
पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ।।
तुका झालासे संतुष्ट । घरां आलें वैकुंठपीठ ।।

कीर्तनरंगांत सर्वांचें भान हरपलें. 'ब्रह्मानंदीं लागे टाळी । कोण देहातें सांभाळी ।।' अशी सर्वांची स्थिति झाली; आणि कुणाच्या ध्यानीं न येतां तुकोबा अदृश्य झाले. श्रोते भानावर येऊन पाहतात तों तुकोबा नाहींत.


तुकोबांच्या वियोगानें त्यांचा परिवार आणि त्यांच्या भक्ति-साम्राज्यांतील प्रजाजन किती विव्हळ झाले असतील, याची कल्पना त्यांचा बंधु जो कान्होबा, त्याच्या आक्रोशावरून येऊं शकते. कान्होबानें हृदय पिळवटून आपल्या परब्रम्हरूप बंधूला हाक दिली आहे –

दु खें दुभागलें हृदय-संपुष्ट । गहिंवरे कंठ दाटताहे ।
ऐसें काय केलें सुमित्रा सखया ? । दिलें टाकोनिया वनामाजीं !
आक्रंदती बाळें करुणावचनीं । त्या शोकें मेदिनी फुटों पाहे ।
काय हें सामर्थ्य नव्हतें तुजपाशीं । संगें न्यावयासी अंगभूतां ?
तुज ठावें आम्हा कोणी नाहीं सखा । उभयलोकीं तुका, तुजवीण !
कान्हा म्हणे तुझ्या वियोगें पोरटीं । जालों, दे रे भेटी बंधुराया !

असाच करुणगंभीर प्रसंग या घटनेपूर्वी सुमारें पावणेचारशें वर्षें इंद्रायणीनें आळंदी येथें पाहिला होता. तो ज्ञानाचा ईश्वर नि आनंदाचा कंद हरपला तेव्हां नामया त्याच्या वियोगानें असाच विव्हळ झाला होता. हें देहूचें चालतें-बोलतें कैवल्यसुख दृष्टीआड झाल्यावर कान्होबा-प्रमाणेंच असंख्य भक्तभाविकांना 'येणें दुःखें माझा फुटो पाहे प्राण' अशा वेदना साहण्याचा प्रसंग प्राप्त झाला.

आजहि या अश्वत्थाखालीं उभें राहून आपण तो प्रसंग मनांत घोळवूं लागलों, म्हणजे मन अस्वस्थ होतें. तुकोबांनीं जन्मभर ज्याचा अट्टाहास घेतला होता, तो 'शेवटचा दिस' त्यांच्या जीवनांत गोड झाला. ते सर्व समकालीनांना 'राम राम' करून अनंताच्या गांवीं गेले; परंतु सगुणाची आवड असलेलें आम्हां पामरांचें मन त्यांच्या सगुणमूर्तीच्या अभावानें वेडें होतें. तें रूप पुनः आपल्यासमोर अवतरावें, आपण डोळ्यांच्या ओंजळीनें तें हृद्यांत सांठवावें आणि पाहतां पाहतां त्याच्या चरणीं लीन व्हावें, असें राहून राहून वाटतें.

या भारावलेल्या मनःस्थितींत आपण शेजारीं डाव्या हाताला पाहिलें तर तिथें आपल्याला तुकोबांची कन्या भागीरथी दिसेल. आपल्या पित्याच्या वियोगाची वार्ता ऐकून ती सासरहून—येलवाडीहून—धांवत आली आणि तिनें टाहो फोडला. तिच्या आक्रो-शानें म्हणे तुकोबा परत सगुणसाकार होऊन प्रगटले आणि त्यांनीं



गोपाळपुऱ्यांतील तुकोबाचें निर्याणस्थळ

आपल्या कन्येच्या डोळ्यांची धणी पुरवली. या कथेंत ऐतिहासिक सत्य असो नसो, त्यांत एक करुणरम्य काव्य आहे, त्यांत एक हृदयस्पर्शी भावना आहे, एवढें निश्चित. या ठिकाणीं भागिरथीची मूर्ति आहे. आणि एका कोपऱ्यांत भजन करीत असलेल्या तुकोबांची काळ्या पाषाणाची पुरुषभर उंच उभी मूर्ति आहे. या डाव्या हातच्या खोलींतून बाहेर पडून आणि अश्वत्थाखालच्या वीणाधारी तुकाराम-मूर्तीला व तुकोबांच्या पादुकांना वंदन करून उजवीकडे वळले कीं विठ्ठलरुक्मिणीचें मंदिर, एक तुळसीवृंदावन व बाजूस मुरलीधराचें मंदिर आहे. हा गोपाळपुऱ्याचा परिसर नांदुरकीच्या शीतळ छायेनें व्यापलेला आहे.

तुका म्हणे आतां मांडिलें निर्वाण !

गोपाळपुऱ्यापासून तीन फर्लांग दूर तो इंद्रायणीचा प्रसिद्ध डोह आहे. याच डोहांत तुकारामाच्या अभंगवाणीला जलदिव्य पत्करावें लागलें. तुकारामांची अभंगवाणी म्हणजे अमृताची बरसात. तिचा रस चाखतां चाखतां कानामनाला धुंदी यावी, असें तिचें सामर्थ्य. त्या वाणीतून जणूं ईश्वराचें मनोगत ओसंडत असे. रंजल्या-गांजल्या जीवांना उद्धाराची वाट दाखविणारी आणि धर्माच्या बुरख्याखालीं समाजाला नागवणाऱ्या दांभिकांच्या पापांचा स्फोट करणारी ती अभंगवाणी इंद्रायणीच्या परिसरांत निनादत होती.

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा । इतरानीं वहावा भार व्यर्थ ।

अशा आत्मविश्वासानें तुकारामांनीं धर्माचें खरें रहस्य सर्वसामान्य जनतेपर्यंत पोंचविलें.

विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।

अशी समतेची उदार घोषणा त्यांनीं कंठरवानें केली. आणि—

या रे या रे लहान थोर । याति भलते नारी नर
करावा विचार — । नलगे चिंता कोणासी ।।

अशी सर्वांना — ब्राह्मण-शूद्र, लहान-थोर, स्त्री-पुरुष, गरीब-श्रीमंत या सर्वांना हाक दिली. त्यांनीं आपल्या अनुभवसंपन्न वाणींतून भक्तीचा डांगोरा पिटला आणि कलिकाळालाहि दरारा निर्माण केला.

फोडिलें भांडार धन्याचा हा माल । मी तव हमाल भारवाही !

अशा विनम्र भूमिकेनें, 'बोलविता धनी' वेगळा आहे याची जाणीव ठेवून तुकोबांनीं आपले व्यापक अनुभव, आपलें सत्यदर्शन शब्दांतून व्यक्त केलें. अनुभवाच्या प्रकाशांत तुकोबांना जें सत्य आढळलें, त्याचा निर्भयपणानें उच्चार करतांना त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नाहीं. तथाकथित प्रतिष्ठितांची, शब्दपंडितांची आणि रूढ अंधश्रद्धांच्या पसाऱ्याची त्यांनीं गय केली नाहीं.

सत्य असत्यासी मन केलें ग्वाही । मानियेलें नाहीं बहुमता !

असली कठोर सत्यनिष्ठा त्यांनीं प्राप्त केली होती. त्याचमुळें त्यांच्या परिसरांतील धर्मपंडित खवळले. एका शूद्रानें मर्यादेचें उल्लंघन करून वेदांतील नि गीतेंतलि रहस्य छातीठोकपणानें चव्हाट्यावर सांगावें आणि उच्चवर्णांची ज्ञानाच्या क्षेत्रांतील मिरासदारी उखडून काढावी, हें धर्ममार्तंडांना कसें रुचणार ? तुकारामांनीं केवळ ज्ञानदानाची गवांदी घातली इतकेंच नव्हे, तर त्यांनीं धर्ममार्तंडांच्या पोपटपंचीवर आणि हृदयशून्य दांभिकपणावरहि हल्ले चढविल्यानें त्यांचें पित्त खवळलें आणि त्यांनीं तुकोबांच्या कंठाला फांस लावण्याचीं आसुरी कारस्थानें उभारलीं. तुकोबांनीं धर्माची बुडवणूक चालविल्याची हाकाटी त्यांनीं सुरू केली. या असंतुष्टांचें पुढारीपण मंबाजीबुवानें पत्करलें आणि तुकारामांच्या वह्या इंद्रायणींत बुडविण्याचा हुकूम मिळविला.

तुकोबांनीं आपल्या हृदयाचा तो अमोल ठेवा, आपल्या सुख-दुःखांची – कळवळ्याची ती कहाणी स्वहस्तें या डोहांत बुडविली, न केलेल्या पापांचें प्रायश्चित्त घेतलें. या घटनेनें तुकोबांचें हृदय विव्हळ झालें. पांडुरंगाच्या स्पर्शानें पावन झालेली, मानवजाती-विषयींच्या कळवळ्यानें ओथंबलेली आणि पापाचा अंधार नाहींसा करणारी ती तेजोमय वाणी पाण्यांत बुडवून धर्मपंडितांनीं काय मिळविलें ?

तुकोबांनीं इंद्रायणीतीरीं धरणें धरलें. तेरा दिवसपर्यंत त्यांनीं अन्नपाणी वर्ज्य केलें; आणि हृदय पिळवटून पांडुरंगाला हांक दिली.

पाषाणाची खोळ घेऊन बैसलासी । काय हृषीकेशी झालें तुज ?
तुजवरी आतां प्राण मी त्यजीन । हत्या मी घालीन पांडुरंगा !
फार विठाबाई धरिली तुझी आस । करीन जीवा नाश पांडुरंगा !
तुका म्हणे आता मांडिलें निर्वाण । प्राण हा सांडीन चंद्रभागे !

हा आक्रोश जणूं पांडुरंगाच्या कानीं गेला. पाषाणाची खोळ टाकून तो चैतन्यघन पांडुरंग जणूं हजारों जनसमुदायाच्या हृदयांत अवतरला आणि स्वमुखानें तुकोबांच्या अभंगवाणीचा घोष करूं लागला. ज्या इंद्रायणींत वह्या बुडविल्या होत्या, त्याच पवित्र सरितेच्या तरंगांवर तुकोबांची अमृतवाणी तरंगूं लागली. अणुरेणूला जिभा फुटल्या आणि विशाल अवकाशाच्या कानांत त्या अभंगांचा विराट निनाद घुमूं लागला. त्या निनादानें जणूं विरोधकांचे कान बधिर झाले आणि पाषाणासारख्या हृदयांचें पाणी होऊन गेलें.

कोण सांगावयास । गेलें होतें देशोदेश ?
वाऱ्या हातीं माप । समर्थ तो माझा बाप !

अशी या प्रसंगाबद्दल तुकोबांनींच साक्ष दिली आहे. वाऱ्याच्या लहरीबरोबर या अभंगवाणीच्याहि लहरी आसमंतांत पसरूं लागल्या. श्रेष्ठ विचार आणि श्रेष्ठ अनुभव कधींच दडपून राहूं शकत नाहींत, याचें हें ढळढळीत उदाहरण आहे. ज्या आत्म्याला शस्त्र छेदूं शकत नाहीं, अग्नि जाळूं शकत नाहीं, त्या आत्म्याच्या गाभ्यांतून प्रसवलेली वाणी तरी नष्ट कशी होईल ?

हाच तो पुण्यपावन डोह—इथेंच या पुण्यसरितेच्या कांठीं तुकोबांनीं आपली वाक्सरिता वाहविली. याच सरितेच्या जळावर पोसलेला तुकोबांचा आत्मा परमात्म्याशीं गुजगोष्टी करूं शकला. अजूनहि सहृदय जीवाला या सरितेच्या तरंगांवर त्या महामानवाची वाणी झंकारित झालेली ऐकूं येईल; त्याची ती थोर जीवनगाथा या तीरावरचे लक्षावधि तरुपर्णेहि कानांत सांगतील; या भूमीचा



अभंगाच्या वह्या बुडविल्या तो डोह

अणुरेणूहि त्या सत्पुरुषाच्या पावलांचा माग दाखवतील – अर्थात् त्यासाठीं शुद्ध अंतःकरण हवें, पापाची लाज हवी, सत्याची चाड हवी आणि परमेश्वराच्या सान्निध्याची ओढ हवी.

वृक्ष-वेली आम्हां सोयरीं वनचरें :

देहूपासून जरा दूर असलेल्या दोन डोंगरांचा तुकोबांच्या आध्यात्मिक उन्नतीशीं जिव्हाळ्याचा संबंध आलेला आहे. देहू-पासून चार मैल दूर वायव्येस भंडारा डोंगर आहे आणि उत्तरेस सहा मैलांवर भामचंद्र डोंगर आहे. भंडाऱ्यावर जुनें शिवमंदिर असून, अलीकडे बांधलेल्या विठ्ठलमंदिरांत तुकोबांच्या पादुका आहेत. माघ शुद्ध दशमीला तुकोबांच्या गुरुबोधाचा दिवस साजरा करण्यासाठीं भंडाऱ्यावर वारकऱ्यांची आणि भाविकांची दाटी होते आणि सबंध रात्र संकीर्तनानें जागवली जाते. भामचंद्राच्या मध्यावर एक कोरीव लेणें आहे. या लेण्यांत महादेवाची पिंडी आहे आणि एका तीर्थंकराची मूर्ति आहे. लेण्याच्या दरवाजावर सप्त मातृका आहेत. हें लेणें इ. स. ११०० च्या सुमाराचें असावें, असें पुरातत्त्व-विशारदांचें मत आहे. बाजूला पाण्याचीं दोन कुंडें आहेत. लेण्याशेजारीं एक तुटका कडा असून, त्या कड्यावर तीस-चाळीस फूट उंचीवर एक घळ आहे. घळीशेजारीं जिवंत पाण्याचा झरा आहे. घळींत प्रवेश करण्याचा मार्ग अगदीं लहान आहे. हल्लीं या घळींत विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिष्ठापना झालेली आहे. लेण्याच्या परिसरांत राहण्यासाठीं पाषाणांत कोरलेल्या ओवऱ्या आहेत. या डोंगरावरील भामनाथाच्या मंदिरांत आणि त्या निगूढ घळींत तपश्चर्येसाठीं तुकोबांच्या पूर्वीपासूनच अनेक बैरागी येत असत. मानभावी साधु आणि नाथपंथी गोसावी यांच्या झुंडीच्या झुंडी येथें दर्शनास आणि एकान्त-साधनास जात असत.

१४०४७

तुकोबांनीं येथें निसर्गसुंदर आणि मनोरम्य परिसरांत एकान्त-साधना आचरली. मन उद्विग्न झालें आणि लोकनिंदेनें मनाचा कोंडमारा होऊं लागला कीं तुकोबा येथें येत आणि येथील पाषाणांच्या भव्यतेनें, निर्मळ निर्झरांच्या संतोषकारी संगीतानें आणि वृक्षवल्लरींच्या छायामय शीतल सहवासानें त्यांना आनंदसमाधि प्राप्त होत असे. मनाच्या विकसनांत निसर्गाचें साह्य फारच होतें. निसर्गांतील नित्य विकसनशीलता, ओसंडून वाहणारी प्रसन्नता, भव्यता, व्यापकता आणि कोमलता मानवी मनाला क्षुद्र विकारांच्या जंजाळांतून बाहेर खेचते आणि एका उदात्त वातावरणांत घेऊन जाते. याचमुळें तुकोबांनीं अनेकदां वृक्षवेलींना 'सोयरीं' बनवून त्यांच्याकडून भव्य आणि सुंदर जीवनाचे धडे गिरवले. येथील पाषाण आजहि आपल्याला अभिमानानें सांगतील: "धन्य आम्ही, तुका देखियला!"

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती :

नदीकांठीं इनामदारांच्या वाड्याच्या पिछाडीस मंबाजी-बुवाची वखळ आहे. आज तिथें शंकराचें लहानसें मंदिर आहे आणि भोंवतीं शेत आहे. याच ठिकाणीं तुकोबांच्या काळीं मंबाजी-बुवानें आपला मठ उभारला होता. तुकोबांचा छळ करणाऱ्या गटांत मंबाजीबुवाचें स्थान फार 'वरचें' होतें. तुकोबांच्या जीवनानें आणि उपदेशानें प्रभावित झालेल्या बहिणाबाईलाहि या महाभागाच्या छळाला तोंड द्यावें लागलें. तुकोबांच्या वह्या बुड-विण्यांतहि मंबाजीबुवाचाच पुढाकार होता. परंतु या खटाटोपाचा उपयोग झाला नाहीं. देहू हें तुकोबांचें स्थान बनलें; मंबाजीचें नव्हे. हा अधिकार हृदयाच्या मोठेपणानें प्राप्त होतो; बाह्य सोंगानें नव्हे. मनांत अहंकाराचा, वासनांचा बुजबुजाट असतांना साधुत्वाचें कितीहि सोंग आणलें, तरी तें पितळ उघडें पडल्यावांचून राहत नाहीं.

आशा ही समूळ खणोनी टाकावी । तेव्हांचि गोसावी व्हावी तेणें ।।
नाहीं तरी सुखें असावे संसारीं । फजिती दुसरी करूं नये ।।

असें तुकोबारायांनीं स्पष्ट बजावलें आहे. मंबाजीबुवासारख्या दांभिकांवर तुकोबांनीं आपल्या वज्रकठोर वाणीचे कठोर प्रहार केले आहेत. अर्थात् तेहि कल्याणबुद्धीनेंच – या दांभिकांना सन्मार्गाला लावावें, यासाठींच. तुकोबांच्या हृदयांत कुणाहिविषयीं कधींच मत्सराची भावना उदित झाली नाहीं. त्यामुळेंच त्यांच्यापुढें शत्रूचे मित्र झाले आणि निंदकहि स्तुति करूं लागले. या किमयेचें मर्म तुकोबा सांगतात –

चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।
विष तें अमृत आघात तें हित । अकर्तव्य नीत होय त्यासी ।।
दुःख तें देईल सर्व सुख फळ । होतील सीतळ अग्निज्वाळा ।।
आवडेल जीवां जीवाचिये परी । सकळा अतरीं एक भाव ।।

## पिढ्यांची भक्तीचा डांगोरा :

देहूचें विठ्ठल-मंदिर आज ज्या स्थितींत दिसतें, तें तुकोबांचें धाकटे चिरंजीव नारायणबाबा यांनीं इ. स. १७२३ मध्यें बांधलें. परंतु मंदिरांतील देवता तुकोबांचे सातवे पूर्वज विश्वंभरबाबा यांच्या वेळेपासूनची आहे. 'माझ्या वडिलांची मिरासी' असें या देवतेचें वर्णन तुकोबा करतात. देऊळवाड्यांतील देवाची जागा साफ करून तेथें तुकोबा कीर्तन करीत. तुकोबांची कीर्ति ऐकून त्यांच्या दर्शनार्थ आसपासच्या दहावीस कोसांतील लोक देहूला येऊं लागले. त्यांची प्रासादिक वाणी आणि अनुभवाचें तेज यामुळें एकादशीचीं संकीर्तनें बरींच गाजूं लागलीं. देवाकडे असलेल्या पंधरा बिघे इनामी बागायतीचें उत्पन्न देवाकडे व अतिथिअभ्यागतांकडे खर्च होऊं लागलें. अर्थात् हा सारा तुकोबांचा वैयक्तिक व्याप होता.

तुकोबांच्या निर्याणानंतर तुकोबांचे सत्प्रवृत्त चिरंजीव नारायणबाबा यांनीं आपल्या पित्याचे शिष्य संताजी पवार यांच्या प्रेरणेनें पित्याचा वारसा चालविला. इ. स. १६८० मध्यें क्षत्रपति संभाजी महाराजांनीं एक खंडी गल्ला व एक होन वार्षिक नेमणूक करून ती गांवखर्चांतून देवविली. इ. स. १६९५ मध्यें राजारामाच्या कारकीर्दीत "तुकोबा थोर सत्पुरुष विस्ववंद्य, यांचा महिमा बहुत आहे, तुकोबांचे दर्शनास कित्येक येतात, त्यासी अन्नदानें गोसावी करविताती. कित्येकास प्रसाद घालावा लागतो व यात्रामोहाछाह प्रत्यहीं होतो" अशी तुकोबांची महती व देहूची कीर्ति ध्यानीं घेऊन येलवाडी हें शेजारचें गांवहि देवाच्या व्यवस्थेसाठीं नारायणबावास इनाम मिळालें. "श्रीचें देवालय हें स्थान बहुत थोर जाग्रतिस्थान" म्हणून बाळाजी विश्वनाथ पेशव्यांनीं पूजा, नंदादीप व नैवेद्य यांसाठीं इ. स. १७०० मध्यें दोन खंडी ज्वारी व साडेचार मण तीळ देणगीरूपानें दिले. "तुकारामबाबा बहुत थोर सत्पुरुष भगवंत साक्षात्कारी पुरुष होते" म्हणून त्यांच्या देवाच्या पूजा-उत्सवास रामचंद्र नीळकंठाकडून इ. स. १७०२ मध्यें अर्धा देहू गांव नारायणबावास इनाम मिळाला. इ. स. १७०८ मध्यें ताराबाईचा दुसरा मुलगा शिवछत्रपति यानें तुकोबांच्या वृंदावनाच्या बांधणी-खर्चासाठीं संपूर्ण देहू गांव इनाम दिलें. त्यानंतर १७०२ मध्यें छत्रपति शाहू महाराजांच्या आर्थिक साहाय्यांतून नारायणबाबानें हल्लीं उभें असलेलें विठ्ठलमंदिर बांधलें. देऊळवाड्यांतील मूर्ति या मंदिरांत नंतर आणवून प्रतिष्ठित केल्या. अशा प्रकारें नारायणबाबानें देहूच्या मंदिराच्या व्यवस्थेला आणि उत्सव-यात्रांच्या प्रबंधाला चालना दिली. हैबतरावबाबांनीं शंभर-सवाशें वर्षांपूर्वी आळंदीची पालखी पंढरपुरीं नेण्याचा क्रम सुरू केल्यावर देहूची पालखीहि

पंढरपुरी जाऊं लागली. तुकोबांची पालखी देहूहून ज्येष्ठ वद्य ८ ला निघते आणि पुणें-सासवड-बारामती-अकलूज या मार्गानें आषाढ शुद्ध ११ ला पंढरपुरीं पोंचते आणि आषाढ वद्य ११ ला परत देहूस येते. इंद्रायणीकांठच्या या दोन महापुरुषांच्या पालख्यांची गांठ पुण्याजवळ पडते आणि नंतर हे भागवतधर्माचे दोन थोर शिल्पकार बरोबरच, जणुं भक्तिप्रेमाचे सुखसंवाद करीत, सहस्रावधि वार-कऱ्यांबरोबर भक्तीचा डांगोरा पिटीत आणि कलिकाळाच्या मनांत दरारा उत्पन्न करीत तें विटेवरचें सांवळें परब्रह्म कवटाळायला जातात. ही ग्यानबा-तुकोबांची पद्यात्रा म्हणजे मराठी भूमीच्या अन्तः-शुद्धीसाठी धांवणारी पुण्यपावन गंगाच !

शिवछत्रपतींच्या मनांत तुकोबांविषयीं परमादर होता, हें सुविख्यात आहेच. शिवछत्रपतीनंतरचे मराठी राज्यकर्ते देहूविषयीं अन् देहूच्या या संताविषयीं किती आदर बाळगून होते, हे वर सांगितलें आहेच. पण तुकोबांना अशा राजाश्रयाची आवश्यकता कधींच भासली नाहीं.

सोने आणि माती । आम्हां समान हे चित्तीं ॥

ही तुकोबांची ऐहिक वैभवाविषयींची भावना. तुकोबा हे मराठी लोकधर्माचे खरे प्रणेते आहेत. महाराष्ट्रांतील सर्व लोकमानसांत जीवनाच्या सात्त्विक प्रेरणा आणि भक्तीची उत्कटता तुकोबां-नींच इतक्या व्यापक प्रमाणांत निर्माण केली. आजहि या सुप्त प्रेरणेला कुणीं समर्थपणें हांक दिली तर ती जागी झाल्याशिवाय राहणार नाहीं.

देहूच्या विठ्ठल-मंदिरांतील उपासनेचा नित्यक्रम पुढील-प्रमाणें असतो : पहांटे पांचच्या सुमारास कांकडआरती, सकाळीं दहा ते अकरापर्यंत पूजा-आरती व नैवेद्यसमर्पण, सायंकाळीं

पांच ते सातच्या दरम्यान प्रवचन आणि रात्रीं आठ ते अकरापर्यंत भजन-संकीर्तन होऊन शेजारती होते व नित्य उपासना संपते. मंदिरांत वीणाधारी मात्र सदैव उभा असतो. वीणा सांभाळण्याच्या पाळ्या ठरवून दिल्या आहेत. ही अष्टौप्रहर रात्रंदिवस छेडली जाणारी वीणा म्हणजे जणुं 'जागृतीं-स्वप्नीं' भक्तीचे झंकार घुमविणारी तुकोबांची हृदयवीणाच. ही प्रतीकाची भावना मनांत आली कीं त्या लाकडी यंत्रावरच्या तारांना नवा अर्थ आलेला प्रतीत होतो.

दर गुरुवारीं आणि एकादशीस मंदिरांत रात्रभर कीर्तनजागर होतो. भजनी मंडळींची दिंडी देवळास प्रदक्षिणा घालते.

या नित्य उपासनेशिवाय देहूस अनेक नैमित्तिक उत्सवहि साजरे होतात. कार्तिक वद्य ११ ला देहूची पालखी आळंदीस जाते; तुकोबा ज्ञानोबांच्या घरीं जातात; ज्ञानभक्तीचा काला जणुं एका ताटांत जेवतात आणि अनेकांच्या हृदयांतील श्रद्धेला ज्ञानाचा डोळा देतात. माघ शुद्ध १० ला तुकोबांच्या गुरूपदेशाचा दिन संकीर्तनाच्या झडीनें साजरा होतो. आणि फाल्गुनांत वद्य २ पासून वद्य ५ पर्यंत यात्रेची झुंबड उडते. या संताच्या निर्याणाची स्मृति जागवण्यासाठीं लाख-दीड लाख मराठी माणसें इंद्रायणीच्या कांठावर जमा होतात. पांडुरंगाशीं एकरूपता पावलेल्या तुकोबांचा पांडुरंगाच्या रूपांतच आपला श्रद्धाभाव वाहतात. बिजेच्या दिवशीं वारकरी भजनी दिंड्या देवळांत देवासमोर भजनाचा हलकल्लोळ निर्माण करतात आणि मध्यान्हीच्या सुमारास तुकोबांच्या पादुका घेऊन, गोपाळपुऱ्यांत जिथें तुकोबांचें महानिर्याण घडलें त्या अश्वत्थ वृक्षाजवळ येतात. तेथें संकीर्तन होऊन पालखी परत देवळांत येते आणि मग रात्रभर भजनाचा महागजर झडत राहतो. इंद्रायणीच्या तीराला चंद्रभागेच्या वाळवंटाचें स्वरूप प्राप्त होतें आणि जणुं तो

अनाथांचा नाथ पांडुरंगच इथें भक्ताच्या कौतुकासाठीं संचार करतो. मन तुकोबांना उद्देशून गाऊं लागतें –

नांदविली भक्ति-पेठ । तुवा इंद्रायणी-तीरीं,
जिथें करावी प्रभूनें । सदा आवडीनें वारी !
थिटी अनंताची वाट । तुझ्या मनाच्या गतींत,
आणि मानव्य जागलें । तुझ्या दिव्य प्रतीतींत !

उपदेशी तुका मेघवृष्टीनें आइका :

इंद्रायणीचें तुकोबांचा 'सांगावा' गेलीं तीन शतकें उरीं सांठविला आहे. 'सांगावा' ती अनंत काळपर्यंत उरांत वागवील आणि आल्या-गेल्या भाविकांना प्रेमभरानें सांगेल. अर्थात् त्यासाठीं मनाचे कान उघडे हवेत.

देहू हें कर्मकांडाचें क्षेत्र नाही. इथें पितृसंतर्पणासाठीं या मोक्षसाधनासाठी दलाली करण्याला वाव नाहीं. इथला सारा व्यवहार रोकडा आहे. 'भाव द्या आणि देव घ्या' हा तुकोबांचा फलक आहे. इथें छक्के-पंजे नाहींत, काळाबाजार नाहीं. तुकोबांनीं कधीं मठ-मंदिरांचें प्रस्थ माजविलें नाहीं; टिळे-टोपी-माळांचें नि भगव्या वस्त्रांचें भावशून्य सोंग संपादिलें नाहीं. त्यांनीं गुरुबाजीचा आव आणला नाहीं आणि संप्रदायाची उभारणी करून संस्थान उभारण्याला वावहि दिला नाहीं. त्यांनीं देवाला समोरासमोर बंदिस्त केला आणि शुद्ध हृदयानें येणाऱ्या प्रत्येकाला 'देवाची लूट' करण्यास प्रारंभ केला.

नेणें फुकों कान । नाही एकांतीचें ज्ञान ॥

असें तुकोबांनीं प्रांजळपणें सांगितलें आहे.

तुकोबांचा बोध अगदीं सरळ सरळ आहे. सर्व भूतमात्रांत परमात्मा भरलेला आहे. त्यामुळें भूतमात्राच्या अंतर्यामीं वसणाऱ्या

परमात्म्याचें भान ठेवून विनम्र वृत्तीनें राहावें, म्हणजे परमेश्वर आपलासा होतो. अखंड नामस्मरण करावें म्हणजे त्या सर्वव्यापी परमेश्वराची जाणीव सदैव हृदयांत ठसते आणि आपल्या नित्य जीवनांत प्रभूला वाईट दिसेल असें कांहीं घडत नाहीं. कोणाहि जीवाचा मत्सर घडूं नये, हेंच त्या सर्वेश्वराच्या पूजनाचें खरें वर्म आहे. साडेतीन हातांचा देह हें त्या परमेश्वराचें मंदिर आहे, याचें सदैव भान ठेवावें, म्हणजे या मंदिराच्या शुद्धीसाठीं माणूस प्रयत्न करील. जिथें प्रभूनें नांदावें, आवडीनें विहार करावा, तें आपलें शरीर विकारांनीं मलिन होऊन कसें चालेल ? त्या शरिरालाच आपण सर्वस्व मानलें आणि त्या शरिरांत नांदणाऱ्या प्रेरक शक्तीचें भान ठेवलें नाहीं, तर तिचें सामर्थ्य तरी आपणांस कसें आकळणार ? म्हणून माणसानें अहंकार जाळून टाकावा. सर्व क्रिया परमेश्वराच्या पूजनाच्या भावनेनें कराव्या. म्हणजे आपोआपच परमेश्वर प्रसन्न होईल आणि –

जेथें पाहे तेथें उभा । अवघा चैतन्याचा गाभा ।।

असा विराट् अनुभव प्राप्त होईल. हा अधिकार सर्वांना आहे. जातिकुळांचीं बंधनें आड येणार नाहींत.

सोपें आहे सोपें आहे । मन साहें जालिया ।।


असें तुकोबांनीं या अनुभवाच्या प्राप्तीचें रहस्य सांगितलें आहे. आपल्या चंचल मनाला विकारांच्या आडरानांतून खेचून उद्दिष्टाच्या गौरीशंकराची दिशा दाखवली म्हणजे सर्व सोपें आहे.

हित व्हावें तरी दंभ दुरी ठेवा ।
चित्तशुद्धि सेवा देवाची हे ।।
आवडी विठ्ठल गाइजे एकांतीं ।
अलभ्य ते येती लाभ घरा ।।

हा तुकोबांचा संदेश इंद्रायणी तुमच्या-आमच्या कानामनांत घुमवीत आहे. तिचें सांगणें आम्हीं मानायला हवें. कारण तिनें चैतन्यघन ज्ञानेश्वरांची अमृतवाणी उरीं रिचविली आहे आणि महामानव तुकोबांचीहि वज्रवाणी हृदयसंपुटांत सांठविली आहे. या दोन विभूतींचें दिव्य जीवन तिच्या साक्षीनें घडलें आहे. ती खोटें कसें सांगेल ?



REFBK-0015052




पंढरपूर–पांडुरंग, सज्जनगड – रामदासस्वामी, आळंदी – ज्ञानेश्वर, पैठण – एकनाथ, जेजुरी – खंडोबा, देहू – तुकाराम, त्र्यंबकेश्वर-नाशिक – श्रीराम, चिंचवड – मोरया गोसावी, कोल्हापूर – महालक्ष्मी, औदुंबर-नरसोबाची वाडी – दत्तात्रय, तुळजापूर–भवानी, नेवासें–मोहिनीराज, ज्ञानेश्वर, कवळें–शांतादुर्गा, मंगेश–शंकर; भीमाशंकर ज्योतिर्लिंग, परशुराम - परशुराम, शिखर-शिंगणापूर – शिवाजी, हरिहरेश्वर – पेशवे, गाणगापूर – नरसिंह सरस्वती, माहूर – दत्त, देवी, अंबे जोगाई– देवी, औंढ्या नागनाथ - ज्योतिर्लिंग, परळी वैजनाथ – ज्योतिर्लिंग, वेरूळ – लेणी, ज्योतिर्लिंग, नांदेड – गोदावरी, बीड – कंकालेश्वर, रामटेक - सीता-राम, सालबर्डी – यात्रा, अमरावती – अंबादेवी; मुक्तागिरी – जैन-क्षेत्र, चांदा – महाकाली, शेगांव – गजानन महाराज, कौंडिण्यपूर – पांडुरंग; कळम्ब – चिंतामणी, दक्षिणद्वार देवगिरी – दौलताबाद.

• • •